**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, रत्नागिरी**
**(नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावयाची संक्षिप्त जाहीरात)**

..........................................................................................................................

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, रत्नागिरी अंतर्गत कार्यालयांमध्ये कंत्राटी अभियंता स्थापत्य ही १० पदे भरणेचे आहे. सदर पदभरतीचे ठिकाण, पदांचे आरक्षण, पदांची संख्या, अनुभव, आवश्यक शैक्षणिक अर्हता, वय,मानधन,कामाचे स्वरुप तसेच आवश्यक अटी व शर्ती निवड प्रक्रियेची माहिती व अर्जाचा नमुना इत्यादीबाबतचा सविस्तर तपशिल www.ratnagiri.nic.ib व www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

उमेदवारांनी जाहिरातीचा व सुचनांचा अभ्यास करुन आपला विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह दिनांक ०९।७।२०२१ रोजी सायं ५.४५ वाजेपर्यंत " मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हा परिषद रत्नागिरी " या पत्त्यावर अथवा कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष सादर करावा. विहित मुदतीनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

सही / xxx
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी. करिता

Scanned by CamScanner

**ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,**
**जिल्हा परिषद, रत्नागिरी**

..........................................................................................................

ग्रामीण पाणी पुरवठा विभागांतर्गत जिल्हा परिषद रत्नागिरी या कार्यालयामध्ये **अभियंता, स्थापत्य** हे पद कंत्राटी पध्दतीने भरण्याचे आहे. सदर पदांची संख्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता याची माहिती पुढीलप्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १. | कंत्राटी अभियंता (स्थापत्य) | १० | अ) मान्यता प्राप्त संस्थेची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका किंवा पदवी<br>ब) मराठीचे ज्ञान आवश्यक<br>क) संगणकाचे ज्ञान आवश्यक<br>( Computer Literate With Working Knowledge MS- Office )<br>(ड) उमेदवार वर्ग १/ वर्ग २ पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा. | वेतन र.रु. २२०००+P.T.A ३००० असणार आहे |

इच्छूक उमेदवारांनी जाहिरातीचा व सुचनांचा अभ्यास करुन आपला सर्व कागदपत्रांसह सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांच्या सत्यप्रतींसह दि.९ जुलै.२०२१ रोजी सायं. ०५:४५ वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पहिला मजला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, जिल्हा परिषद रत्नागिरी, या पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत सादर करावा. विहित तारखेनंतर आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. तसेच अपूर्ण स्वरुपात आलेले अर्ज पदभरती प्रक्रियेसाठी विचारात घेतले जाणार नाहीत, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. पदभरती प्रक्रियेत बदल करणेचा अथवा रद्द करणेचे अधिकार निवड समितीस राहतील.

सही / xxx
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी. करिता

Scanned by CamScanner

# अटी व शर्ती

| | |
|---|---|
| १ | अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वयाचा पुरावा, महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असलेबाबत प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. तसे न केल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारण्यात येईल. |
| २ | उमेदवाराने सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार A-४ आकाराच्या कागदावर एकाच बाजूला संगणकावर टंकलिखीत अर्ज करावा. |
| ३ | उमेदवाराने अर्जावर पासपोर्ट आकाराच्या अलिकडील रंगीत फोटो लावून त्यावर स्वत:ची स्वाक्षरी करावी. |
| ४ | अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा कमाल ७० वर्ष राहील. |
| ५ | उमेदवाराने विहित नमुन्यात भरुन पाठविलेले अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दिनांक ०९ जुलै .२०२१ रोजी सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी कार्यालयात पोहोचतील अशा बेताने पोस्टाने अथवा हातरवानगीने पाठवावेत. कोणत्याही कारणाने विलंबाने प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. |
| ६ | अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांची यादी www.ratnagiri.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना आवश्यकतेनुसार मुलाखतीसाठी स्वखर्चाने परिक्षेच्या ठिकाणी हजर रहावे लागेल. या बाबत उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवास भत्ता दिला जाणार नाही. |
| ७ | मुलाखतीबाबतचे वेळापत्रक नंतर प्रसिध्द करण्यात येईल. निवड झालेला उमेदवार ८ दिवसात कार्यालयात हजर न झाल्यास सदरहू नियुक्ती आदेश रद्द समजणेत येईल. |
| ८ | न्यायालयीन स्थगिती / निवाडा किंवा शासन निर्णयामुळे निवड प्रक्रिया कुठल्याही स्तरावर स्थगित अथवा रद्द अथवा बदल करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील. |
| ९ | निवड झाल्यानंतर र. रु.१००/- च्या मुद्रांक पेपरवर आवश्यक अटी व शर्तीनुसार करारपत्र करुन द्यावे लागेल. |
| १० | सदरचे पद कंत्राटी पध्दतीचे असल्याने भविष्यात सदरची नेमणूक नियमित शासकीय सेवा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाही. अथवा सदर बाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही. |
| ११ | उमेदवाराने शारीरीक- मानसिक सक्षमतेचे प्राथमिक आरोग्य केंद्र/नगरपालीका/जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र करारनामा करतेवेळी सादर करावे. |
| १२ | सेवानिवृत्तीच्या आदेशाची प्रत सोबत सादर करावी. |
| १३ | शासकीय कार्यलये/शासनाचे उपक्रम/स्थानीक स्वराज्य संस्थांमधील वरीलप्रमाणे Empanelment केलेले सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांची करार पध्दतीने करण्यात येणारी नियुक्ती ही नियमित स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ विवक्षित कामासाठीच करण्यात येणार आहे. |
| १४ | कंत्राटी अभियंता या पदाची कर्तव्ये - जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हयातील नळपाणी पुरवठा योजनेचे सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रक तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे आणि कामांचे पर्यवेक्षण करणे इत्यादी या जबाबदा-या नियुक्ती कंत्राटी अभियंता यांच्या राहतील. |
| १४ | कंत्राटी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना वेतन र.रु. २२०००/-+ P.T.A रु.३०००/- मात्र देय राहणार आहे. |
| १५ | अशा विवक्षित कामासाठी नेमणूक असल्याकारणाने विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव आवश्यक आहे. |

Scanned by CamScanner

| | |
|---|---|
| १६ | करार पध्दतीने नियुक्ती केल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल. |
| १७ | नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पुर्ण करण्याची जबाबदारी राहील व तसे बंधपत्र /हमीपत्र संबंधितांनी भरुन दयावे. |
| १८ | नेमलेले अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी कारवाई चालु अथवा प्रस्तावीत नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी. |
| १९ | नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकारी राहतील. |
| २० | अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नासावा. |
| २१ | अधिकारी/ कर्मचारी यांनी conflict of interest जाहीर करणे आवश्यक राहील. |
| २२ | अधिकारी/ कर्मचारी यांना आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. |
| २३ | अधिकारी/ कर्मचारी यांनी प्राप्त होणा-या कागदपत्रे /माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. |
| २४ | अधिकारी/ कर्मचारी यांचेवर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. तसेच त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्ती प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यमापन +- करतील. |

सही / xxx
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी. करिता

Scanned by CamScanner

# अर्जाचा नमुना

| उमेदवाराचा अलीकडे काढलेला स्व-स्वाक्षरीत फोटो |
|---|

**पदाचे नांव-**

१.उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम):-

२.जन्मतारीख (सोबत आवश्य कागदपत्रे):-

अर्ज करण्याच्या अंतिम दि.१५।७।२१ रोजी वय:- (७०पेक्षा जास्त असू नये.)

३. जन्माचे ठिकाण :-

४.शैक्षणिक/तांत्रिक पात्रता.

| अ.क्र. | उत्तीर्ण झालेलया परीक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्कवारी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

५. अवगत असलेल्या भाषा :-

| अ.क्र. | भाषा | बोलता येते (होय / नाही ) | वाचता येत |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

६. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता व ई-मेल ( पत्ता पीन कोडसह ) :-

७. संपर्कासाठी दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्र ( वैयक्तिक) :-

८. शासकीय सेवेतील कामाचा अनुभव ( कालानुक्रम निहाय ) :-

| अ.क्र. | काम केलेली संस्था व पत्ता | कामाचा कालावधी | | पदाचे नाव व वेतन | कामकाजाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

९. सेवानिवृत्तीच्या आदेशाची प्रत :-

१०.इतर तपशिल

Scanned by CamScanner

# प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणीत करतो/ करते, की, प्रस्तुत पदाची जाहिरात वाचली असून त्यातील पदविषयक माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे व मला ती मान्य आहे. सदर परिक्षेस प्रवेश मिळविण्यासाठी नमुद केलेल्या सर्व अटी व शर्तींची मी पूर्तता करतो /करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलली माहिती खोटी व चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला दिलेला प्रवेश रदद हाईल आणि मिळालेली नोकरी गमावण्यास मी बांधील राहीन व पुढील योग्य त्या कार्यवाहीस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

स्थळ -
दिनांक-

सेवानिवृत्त अभियंता यांचे संपुर्ण नाव व स्वाक्षरी

Scanned by CamScanner